नियमीत दिवाणी दावा क्र.१०४१/२०२४

दत्ता कारकिले वि. जहांगीर गिलानी

निशाणी क्रमांक–४५

प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ यांचा शपथेवर उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.पी.एम.सुर्यवंशी यांच्यातर्फे सुरू:–

माझे एम.ए.बी.पी.एड्. पर्यंत शिक्षण झालेले आहे. आम्ही तिघेजण भाऊ असून आम्हाला दोन बहिणी आहेत. माझे वडील आता हयात नसून आई हयात आहे. आमच्या वडिलार्जीत मिळकतीचा क्र.४७१ असा आहे. या व्यितिरिक्त अन्य कोणतीही मिळकत आमच्याकडे नाही. मी बालाजी कारकिलेला ओळखत नाही. मी दत्ता करकिले यांच्या वडिलांना किंवा आजोबांना ओळखत नाही. मिळकत ही पूर्वी माझा आजा जमालसाब बहाउद्दीन यांच्या नावची होती. मी त्याबाबत कागदपत्र दाखल करू शकतो. सन १९३१ ला ती कबालाद्वारे मिळाली. मी कबाला या दाव्याच्या कामी दाखल करून शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मिळकत रंगराव विठोबा करकिले यांच्या नावे असणारी मिळकत होय. हे म्हणणे खरे नाही की, ती मिळकत रंगराव विठोबा करकिले यांची खरेदीची मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की, रंगराव विठोबा यांची मिळकत १२८० चौरस फुट क्षेत्राची होती. रंगराव विठोबा करकिले याने बालाजी करकिले यांना ६४० चौरस फुट क्षेत्र सन १९८४ साली विक्री केल्याच्या माझ्या माहितीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, रंगराव करकिले यानी दिपक खेळगे यांना ६४० चौरस फुट क्षेत्र विक्री केले. बालाजी करकिले यांच्या नावे ग्राम पंचायतीच्या ८–अ च्या उताऱ्याला नोंद झाल्याचे माझ्या माहितीत नाही. दाव्यामध्ये नमूद असणाऱ्या चतुःसिमा पाहुन असे मी माझ्या प्रतिज्ञापत्रात म्हणलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८६ पासून दावा मिळकतीत बालाजीचा ताबा होता व त्याच्या पश्चात वादीचा ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत ही खुली व मोकळी जागा आहे. बालाजी करकिलेच्या सन १९८६ च्या खरेदीपत्राबाबत आम्ही उजर दाखल केलेली नाही कारण आम्हाला त्या खरेदीपत्राबाबत माहिती नाही.

**<u>निशाणी क्रमांक–४५</u>**

बाबुपाशा, गंगाधर तोंडारे वगैरे लोकांना मी ओळखत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यांनी जहांगिर, हुकूमत, जिलानी यांच्या विरुद्ध सन १९९१ मुकदमा क्र.२८७/१९९१ दाखल केल्याचे माहितीत आहे. त्या दाव्याच्या कामी आम्ही प्रतिदावा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी बाबुपाशा यांचा दावा मंजूर झाला व आमचा रद्द झाला होता. आम्ही अपिल क्र.१८६/१९९७ जिल्हा न्यायालयात दाखल केलेले, ते अपिल रद्द झाले. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीशी माझा कसलाही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादींनी मिळकतीमध्ये शेड बांधू नये म्हणून मी त्याला धमक्या देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीची आम्हाला कायदेशीर मालकी नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८९ पासून दावा मिळकतीमध्ये मी वास्तवास आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत १९३७ मध्ये ती मिळकत महमद जमनोद्दीन व महोमद काशीमसाब यांना इनाम मिळाली आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत आमच्याकडे भाडेपट्याने आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

पुनःतपास नाही.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.10 12:44:41 +0530

**( श्री. व्ही. आर. घराळ )**

**ठिकाणः उदगीर** **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**दिनांकः– १०/०७/२०२६** **उदगीर.**